सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० / २६३३३३३९    Website:- www.barti.in    E-mail: - dg@barti.in

# पोलीस, मिलिटरी आणि पॅरा मिलिटरी भरती पूर्व नि:शुल्क आणि निवासी प्रशिक्षणाकरीता महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील युवक-युवतींना पोलीस, मिलिटरी आणि पॅरा मिलिटरी भरती पूर्व नि:शुल्क आणि निवासी प्रशिक्षणाकरीता **महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या.** (MESCO) प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून **पुणे, सातारा, आणि बुलढाणा** या ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (MESCO) पुणे | ५० |
| २. | महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (MESCO), सातारा | ८० |
| ३. | महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (MESCO), बुलढाणा | १२० |
| | **एकूण** | **२५०** |

**पात्रता :**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
२) उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
३) पोलीस भरती करीता उमेदवाराचे वय १९ ते ३२ वर्षापर्यंत असावे व मिलिटरी भरती करीता वय १७ ते २१ वर्षापर्यंत असावे.
४) पोलीस भरती करीता उमेदवार किमान १२ वी उत्तीर्ण असावा व मिलिटरी भरती करीता किमान १० वी उत्तीर्ण असावा.
५) पुरुष उमेदवारांची उंची किमान १६५ से.मी. व महिला उमेदवारांसाठी किमान १५५ से.मी. असावी.
६) पोलीस, मिलिटरी व पॅरा मिलिटरी भरतीच्या शारीरिक क्षमता चाचणीच्या पात्रतेनुसार उमेदवारांना निकष लागू राहतील.
७) रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असतील.

**विद्यार्थी निवडीचे निकष :**

- प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने गुणवत्ता यादीतील रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या सर्व पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**आरक्षण :**

- ३० % जागा महिलांसाठी राखीव
- ५ % जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील मांग, मातंग,होलार, वाल्मिकी, मादगी या व इतर तत्सम जातीसाठी राखीव
- एकूण जागांच्या ५% जागा विशेष बाब म्हणून राखीव

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- **ऑनलाईन नोंदणी करण्याची शेवटची तारीख ३१/१२/२०२३**
- प्रशिक्षण कालावधी – ३ महिने (निवासी)
- प्रशिक्षण कालावधी मध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय प्रशिक्षण केंद्रात केली जाईल.
- सदर योजनेबाबत/ प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी व शासनास राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये शासकीय/निमशासकीय/खाजगी ठिकाणी नोकरी व व्यवसाय करता येणार नाही.
- ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी, पुणे मार्फत पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण, बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षा, MPSC व UPSC परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण यापूर्वी घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.
- **इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि.१९/१२/२०२३ पासून** http://mescoltd.co.in/Barti.aspx **या लिंकवर ऑनलाईन अर्जाची नोंदणी करावी.**

**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**